वाहन अपघात नुकसान भरपाई याचिका क्र.२२/२०१७

निशाणी ३७ आदेश

१. अर्ज वाचला.

२. याचिकाकर्त्याचे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

३. नि.३ च्या यादीसोबत फिर्यादीचा जबाब, घटनास्थळ पंचनामा, पुरवणी जबाब, साक्षीदाराचा जबाब, आरटीओने दिलेली माहिती यासर्व कागदपत्रांच्या सही शिक्कयांच्या नकला दाखल आहेत. याव्यतिरिक्त दोन मुळ डिस्चार्ज कार्ड व दोषारोपपत्राची सही शिक्कयांची नक्कल दाखल आहे. उपरोक्त नमुद सर्व दस्तांना निशाणी क्रमांक देणे याचिकेच्या न्यायनिणर्यासाठी आवश्यक आहे. सबब आज त्यांना अनुक्रमे निशाणी क्रमांक ३८ ते ४५ दिले.

४. निशाणी २७ चे यादीसोबत वैद्यकीय उपचाराचे खर्चाच्या मुळ पावत्या अनुक्रमांक १ ते ३०, अनुक्रमांक ३१ चा वैदयकीय दाखला व अनुक्रमांक ३२ चा क्षकिरण तपासणी अहवाल हे मुळ दस्त दाखल आहेत. उपरोक्त नमुद सर्व दस्तांना निशाणी क्रमांक देणे याचिकेच्या न्यायनिणर्यासाठी आवश्यक आहे. सबब आज त्यांना अनुक्रमे निशाणी क्रमांक ४६ ते ७६ दिले.

५. निशाणी ३५ चा डॉ.नेहुलकर यांचा पुरावा प्रतिज्ञालेख वाचला. त्यानुसार त्यांनी दिलेला निशाणी ३२ चे यादीसोबतचे तीन्ही दस्तांना याचिकेच्या न्यायनिणर्यासाठी निशाणी क्रमांक देणे आवश्यक आहे. सबब आज त्यांना अनुक्रमे निशाणी क्रमांक ७७ ते ७९ दिले.

६. सबब अर्ज नि.३७ मंजूर.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.01 17:24:59 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक – ०१/१०/२०२५ जिल्हा न्यायाधीश क्र. २

संगमनेर